

## गोष्टीरूप

# रामायण

शिवाजी शेटे

परी प्रकाशन

**गोष्टीरूप रामायण**

◆


© सुरक्षित

◆

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

◆

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

◆

**किंमत :**
रुपये १२०/-

## बालचमूंसाठी 'परी'चे बालसाहित्य

१. पंचतंत्रातील गोष्टी
२. गोष्टीतून संस्कार
३. खजिना साहसकथांचा
४. साहसी चिनू
५. अद्‌भुत जादूई नगरी
६. तेनाली रामनच्या रंजक कथा
७. आला रे आला...टारझन आला
८. नीतीकथा
९. बिरबलच्या चातुर्यकथा
१०. गोष्टी गमतीजमतीच्या
११. प्रत्येक रात्र-नवी गोष्ट...अरेबियन नाईटस्
१२. मोगली
१३. शेखचिल्ली व हातिमताईच्या कथा
१४. हितोपदेश
१५. प्राण्यांच्या मजेदार कथा
१६. पऱ्यांच्या अद्‌भुत दुनियेत
१७. बालगोपालांसाठी बडबडगीते
१८. मिळवा प्रयोगातून ज्ञान
१९. कथा मुल्ला नसरुद्दीनच्या
२०. सोबती शालेय अभ्यासाचा
२१. सफर ऐतिहासिक किल्ल्यांची
२२. भारतीय सण-उत्सव - भाग १
२३. भारतीय सण-उत्सव - भाग २
२४. ओळख थोर नेत्यांची
२५. माहिती घेऊया राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय खेळांची
२६. गोष्टीरूप महाभारत - भाग १
२७. गोष्टीरूप महाभारत - भाग २
२८. असे शोध असे संशोधक भाग १
२९. असे शोध असे संशोधक भाग २
३०. गणपती बाप्पा मोरया...!
३१. सिंड्रेला आणि इतर कथा
३२. आजी-आजोबांच्या छान छान गोष्टी
३३. ओळख संगीतशास्त्राची
३४. क्रांतिकारकांच्या कथा
३५. थरार कथा - भाग १
३६. महान स्त्रिया
३७. ओळख अंतराळविश्वाची
३८. यांनी घडविला समाज

# गोष्टीरूप रामायण

## वाल्मिकी ऋषींची पूर्वकथा

एका घनदाट अरण्यात वाल्या नावाचा एक क्रूर माणूस राहात होता. वाटमाऱ्या करणे हाच त्याचा उद्योग होता. त्या अरण्यातून कुणी वाटसरू जाऊ लागला की, हा वाल्या त्याला पकडीत असे. त्याच्या जवळचं सारं द्रव्य तो हिसकावून घेत असे. अशा वेळी त्या वाटसरूनं जर जवळचं धन द्यायला नकार दिला तर वाल्या सरळ त्याला आपल्या जवळच्या धारदार कुऱ्हाडीने ठार मारीत असे व त्याच्या जवळचं सारं धन व इतर साहित्य घेऊन तो आपण राहात असलेल्या गुहेत घेऊन जात असे.

त्या गुहेत त्याचे वृद्ध आई-वडील व बायकामुलं राहात होती. वाल्यानं लुबाडून आणलेल्या सर्व धन-वस्तूंवर त्या सर्वांची गुजारणा आनंदाने सुरू होती.

हे सर्व करत असताना वाल्यानं एक नियम मात्र पाळला होता. एखाद्या माणसाची त्यानं हत्या केली की एक खडा तो एका रांजणात टाकत होता. होता होता आतापर्यंत त्याचे सात रांजण तसे भरत आले होते. एवढ्यावरून त्यानं किती निरपराध लोकांना ठार मारलं असावं याची कल्पना येईल.



असाच एकदा तो रानात वाटमारी करण्यासाठी एका भल्या मोठ्या वृक्षाच्या आडोशाला टपून बसला होता. इतक्यात वीणेचा झंकार त्याच्या कानांवर पडला. वाल्या सावध झाला.

त्या वाटेने तिन्ही लोकांत प्रसिद्ध असलेले नारदमुनी वाटेने

नारायणाचा जप करत चालले होते. ते जवळ येताच वाल्या टुणकन उडी मारून आपल्या हातातली धारदार कुऱ्हाड सांभाळत एकदम त्यांच्या समोर आला आणि आपली धारदार नजर नारदमुनींच्यावर रोखत तो वीज कडाडावी तशा आवाजात ओरडला,

''ए, तुझ्या जवळ जे काही असेल ते मला देऊन टाक नाहीतर मरणाला तयार हो.''

नारदमुनींनी शांतपणे त्याच्याकडं पाहिलं. त्यांच्या चेहऱ्यावर भीतीचा अंशसुद्धा उमटला नव्हता.

आपला त्याच्यावर काहीच परिणाम होत नाही असं पाहून वाल्या एकदम पुढं आला. कुऱ्हाड धरलेला आपला उजवा हात त्यानं उंच धरला आणि आपल्या आवाजात आणखी जरब आणीत तो ओरडला, ''मी काय म्हणालो ते तुझ्या लक्षात आलेलं नाही असं मला वाटतं. तुझ्याजवळ जे काही असेल ते मला मुकाट्यानं देऊन टाक नाहीतर या क्षणी या कुऱ्हाडीने तुझ्या शरीराची खांडोळी करून टाकीन.''

नारदांनी आपल्या वीणेचा झंकार पुन्हा केला आणि आपला हात उंच करून त्याला थांबवत ते आपल्या मधूर स्वरात म्हणाले,

''तू मला मारणार असशील तर जरूर मार; पण माझे एक म्हणणे ऐकून घे. माणसे मारून अशी वाटमारी करण्यात आजपर्यंत तू बरीच वर्षे घालवली असशील. तू मिळवलेल्या धनसंपत्तीमुळे तुझे आई-वडील, बायका-मुलं अगदी सुखात असतील; पण त्यांना सुखात ठेवण्यासाठी तू जे हे रोज पाप करत आहेस त्या पापाचा धनी तू एकटाच आहेस का त्या पापात तुझ्या घरची सर्व माणसं वाटेकरी आहेत ? मला वाटतं, हे तू जे रोज असं पाप करत आहेस ते सारं तुझ्याच माथ्यावर असणार आणि या पापाचा धनी तू एकटाच असणार. तुझ्या मृत्यूनंतर तू नरकात ज्या वेळी अत्यंत हालअपेष्टा सोसत राहशील, केलेल्या पापाचं फळ भोगत राहशील त्या वेळी तुझे आई-वडील, तुझी बायको-मुलं तुला सोडायला येतील का ? तू मिळवून आणलेल्या धनावर जसे ते हक्क सांगतात तसे तुझ्या पापांवर पण ते आपला हक्क सांगून तुझी नरकयातना स्वत:ही भोगायला तयार होतील का ? आधी घरी जा आणि तुझ्या घरच्या सर्व लोकांना एकच प्रश्न विचारून ये. त्यांना विचार 'मी अनेक लोकांना मारले व तुमचे पोट भरले. माझ्या धनात जर तुम्ही वाटेकरी झाला आहात तर आता तुम्ही माझ्या पापातही वाटेकरी व्हाल का ?' बस तू एवढं विचारून परत ये. तोपर्यंत मी इथेच थांबतो.''

नारदमुनींचं बोलणं वाल्याच्या हृदयाला भिडलं. त्याची मनस्थिती चलबिचल झाली. हा म्हणतो ते खरं असेल का ? का आपली सुटका करण्यासाठी काहीबाही सांगून हा मला घरी पाठवत असेल ? पण... पण त्याच्या बोलण्यावरून हा खोटं बोलत नसावा असं वाटतं.

वाल्यानं क्षणभर विचार केला आणि तो तसाच धावत आपल्या गुहेकडं आला. तो रिकाम्या हातानं परत आलेला पाहून त्याच्या आई-वडिलांना व बायको-मुलांना आश्चर्य वाटले. तसा धापा टाकत वाल्या त्या सर्वांना म्हणाला,

''मी वाटमाऱ्या करतो. आपल्या सर्वांचं पोटपाणी व्यवस्थित चालावं म्हणून मी प्रसंगी लोकांना ठारही मारतो. खडे टाकून मी किती रांजण भरले आहेत हे बघा. या पापाचं फळ जेव्हा मिळेल

तेव्हा तुम्ही पण प्रत्येकानं थोडा थोडा पापाचा वाटा आपल्या माथी घ्यायला हवा. त्या पापात तुम्ही पण वाटेकरी व्हायला हवं.''

त्याचं ते बोलणं ऐकून सर्वजण चकित झाले. तसे त्याचे आईवडील त्याला म्हणाले,

''ते कसं शक्य आहे ? आईबापाचं पालन करणं हे मुलाचं कर्तव्य असतं. मुलगा जे आणून देईल ते खाऊन आम्ही आयुष्य कंठीत आहोत. वाटमारीचा मार्ग तू पत्कर असं कधीच आम्ही तुला सांगितलं नव्हतं आणि तू काय करत आहेस, कसं मिळवत आहेस याच्याशी आमचा काही संबंध नाही. त्यामुळं तुझ्या पापात आम्ही वाटेकरी का होऊ ?''

आई-वडिलांचं हे उत्तर ऐकून वाल्याला प्रचंड मोठा धक्का बसला. त्यानं कसंतरी स्वत:ला सावरलं आणि मग मोठ्या आशेनं त्यानं आपल्या बायकोकडं पाहिलं तशी ती चटकन म्हणाली,

''हे बघा, आमचं पालनपोषण करणं हे तुमचं कर्तव्य आहे. ते तुम्ही करत आहात. आता ते तुम्ही कशा प्रकारे करता याच्याशी आमचा काय संबंध ? तुमचं पाप आम्ही आमच्या डोक्यावर का म्हणून घेऊ ? तुम्ही जे करता ते तुम्हीच भोगलं पाहिजे.''

बायकोच्या या उत्तरानं वाल्या कासावीस झाला. दु:खानं तो व्याकूळ झाला. शेवटी त्यानं आपल्या मुलांच्याकडं पाहिलं; पण त्याच्या मुलांनीही त्याच्या पापात वाटेकरी व्हायला कबुली दिली नाही.

वाल्या कितीतरी उशीर तसा खचल्यासारखा उभा होता. पश्चात्तापानं मग होरपळतच तो परत नारदमुनींच्याकडं आला आणि झटकन त्यानं त्यांच्या पायावर डोकं ठेवलं. नारदमुनींच्या चरणावर त्याच्या डोळ्यांतले थेंब गळू लागले. नारदांचे पाय घट्ट धरीत तो आपल्या पश्चात्तापदग्ध स्वरात त्यांना म्हणाला, ''हे महान पवित्र साधू-पुरुषा खरंच आज माझी चूक मला कळली. माझ्या घरचे लोक माझ्या संपत्तीत भागीदार आहेत; पण माझ्या पापात कुणीही भागीदार व्हायला तयार नाहीत. त्या सर्वांचं खरं रूप आज माझ्या ध्यानी आलं आहे. आजपर्यंत मी खूप हत्या केल्या. त्याचा मला आता खरोखर पश्चात्ताप होत आहे. आता इथून पुढं माझ्या हातून तशी कोणतीच चूक होणार नाही याची खात्री मी तुम्हाला देतो; पण मी आजवर जे काही पाप केलं आहे त्याचं शालन कोणत्या पद्धतीनं होईल याचा मार्ग कृपया आपण मला दाखवावा. माझा उद्धार आपण करावा. मी तुम्हाला शरण आलो आहे.''

नारदांनी क्षणभर विचार केला. वाल्याला पूर्णपणे आपली चूक कळून त्याला पश्चात्ताप झालेला आहे हे त्यांनी ओळखलं. त्यांनी वाल्याला उठवून उभं केलं आणि आपल्या मधुर, प्रेमळ स्वरात ते त्याला म्हणाले,

''तुझा जरूर उद्धार होईल; पण मी सांगतो ते ऐक. तू रामाला शरण जा आणि 'राम राम' असा जप करत राहा.''

वाल्याला 'राम राम' म्हणणं प्रथम जड जाऊ लागलं. राम राम याऐवजी तो मरा मरा असंच म्हणू लागला. कारण मरा हा शब्द त्याच्या नित्य परिचयातला होता. मग नारदांनी त्याच्याजवळ थांबून त्याच्याकडून 'राम राम' असं वदवून घेतलं. तो आता अगदी व्यवस्थितपणे राम राम म्हणतोय हे लक्षात आल्यावर नारद त्याला म्हणाले,

''आता तू 'राम राम' असं व्यवस्थित म्हणू लागला आहेस. आता तू हाच जप करत इथंच बसून राहा. तुझा उद्धार झाल्याशिवाय राहणार नाही.''

आणि एवढं बोलून नारदमुनी वीणेच्या तारा छेडत 'नारायण नारायण' असा जयघोष करत निघून गेले.

वाल्यानं आपल्या हातातली कुऱ्हाड कधीच फेकून दिली होती. तो त्या मोठ्या वृक्षाच्या बुंध्याजवळ शांतपणे बसला आणि डोळे मिटून त्यानं रामाचा जप करायला सुरुवात केली. त्याच्या मुखातून 'राम राम राम राम' एवढीच अक्षरे सतत बाहेर पडत राहिली.

वाल्याला आपल्या तहान भुकेचाच काय पण आपल्या शरीराचाही विसर पडला.

दिवसामागून दिवस जात होते. वाल्या रामाच्या जपात इतका तल्लीन होऊन गेला होता की किती महिने, किती वर्षे आपण या एकाच जागेवर बसलो आहोत याची पण त्याला शुद्ध नव्हती. काही वर्षांनी तर मुंग्यांनी त्याच्या शरीराभोवती वारूळ तयार केलं. वाल्या त्या वारुळातून दिसेनासा झाला.


पण तरीही त्याच्या मुखातून सतत 'राम राम' हे शब्द बाहेर पडत होते.

आणखी अशीच काही वर्षे लोटली. एकदा त्याच वाटेने नारदमुनी निघाले असता त्यांना एकदम मागे कितीतरी वर्षांपूर्वी घडलेली ती घटना आठवली. वाल्याची त्यांना एकदम आठवण आली आणि त्याच क्षणी त्यांच्या कानांवर शब्द आले,

''राम राम राम राम राम ...''

नारदांनी थबकून इकडं तिकडं पाहिलं. तो आवाज कुठून येतोय हे ते पाहू लागले.

आणि एकदम त्यांचं लक्ष त्या मुंग्यांच्या वारुळाकडं गेलं. आवाज तिथूनच येत होता.



नारदांनी हळूहळू माती दूर केली. सारी माती बाजूला केल्यावर त्यांना आत बसलेला वृद्ध ऋषी दिसला. हा वाल्याच असणार याची खात्री चटकन नारदांना झाली. वाल्याची समाधी लागली होती.

नारदांनी त्याला हलवून समाधीतून जागे केले. नारदांना पाहाताच वाल्याचे डोळे भरून आले. त्यानं चटकन त्यांच्या पायावर डोकं ठेवलं. वाल्याच्या मुखांवर आता विलक्षण शांती होती, तेज होतं. वाल्याचा आता वाल्मिकी ऋषी झाला होता.

वाल्या आता ज्ञानी झाला होता. रामनामाच्या जपाने तो पूर्णपणे शुद्ध झाला होता. पवित्र झाला होता. नारदाची थोरवी त्याला कळाली होती. दाटलेल्या कंठाने तो म्हणाला,

''मुनीवर्य, मी आपणाला ओळखले. खरंच आपण थोर आहात, श्रेष्ठ आहात. माझ्यावर तुमची केवढी कृपा झाली. आता मी पुढं काय करावं अशी आपली इच्छा आहे, ती मला सांगावी.''

नारद मधुर हसले. वाल्यात झालेला बदल त्यांना सुखावून गेला होता. त्याच्या पाठीवर हात ठेवत ते म्हणाले,

''हे बघ, वाल्मिक म्हणजे मुंग्यांचे वारूळ. त्यात तू बसला होतास म्हणून तुझे नाव मी वाल्मिकी ठेवतो. तर तू आता त्रिकालज्ञानी होशील. पुढे अयोध्येमध्ये श्रीराम अवतार घेणार आहेत. ते विष्णूचाच अवतार असतील. तू त्यांचे उत्तम चरित्र काव्यरूपाने वर्णन कर. तुला सर्व ज्ञान आपोआप प्राप्त होईल.

एवढं बोलून नारद त्याला आशीर्वाद देऊन निघून गेले.

वाल्मिकी इकडं तिकडं पाहू लागला. आजूबाजूच्या सृष्टीसौंदर्यानं त्याची प्रतिभा जागृत झाली. त्याचं मन कोमल झालं. मग नदीच्या काठी त्यानं आश्रम बांधला.

आणि आश्रमात राहून तो काव्यरचना करू लागला.

वाल्मिकीनं रचलेलं प्रभू रामचंद्रांचं शतकोटी श्लोकांचं काव्य दिव्य झालं होतं. पृथ्वीवरीलच काय पण पाताळातले आणि स्वर्गातले लोकही म्हणू लागले की, ते काव्य आम्हाला हवं. इतकी थोर रचना वाल्मिकीनं रामायणाची केली होती आणि तेव्हापासून ते खरे वाल्मिकी ऋषी म्हणून सर्वत्र वंदनीय झाले.

✦

## अयोध्या मनूनिर्मित नगरी

आर्यवर्तात कोसल नावाचा एक विस्तीर्ण व सुपीक देश असून तिथून शरयू नावाची मोठी जलविपुल नदी वाहत आहे. त्या नदीच्या काठावर अयोध्या नगरीची स्थापना खुद्द मनूने केली. मनू हा सूर्यपुत्र होता.

अयोध्या नगरीची रचना फार कौशल्याने निर्माण केली होती. या शहरामधून मोठमोठे रुंद राजरस्ते ठेवले होते. त्या रस्त्यांवर रोज सुवासिक पाणी टाकले जाऊन ठिकठिकाणी फुलांचे मोठमोठे उपहार मांडले जात. नगरातील बहुतेक वाडे सात मजली असून त्यांच्या कलात्मक उंच बांधकामामुळे त्यांनी अयोध्येत चांगलीच शोभा आणली होती. शहराभोवती उंच व मजबूत कोट होता. शहरातील घराघरांवर रत्न तोरणे दिसत असायची आणि घराच्या अवतीभोवती रम्य उपवने असत.

शहराच्या दरवाजावरून व कोटावरच्या ठिकठिकाणच्या बुरुजावरून युद्धासाठी युद्धसामग्री नेहमी जय्यत ठेवलेली असे. विंध्य पर्वतावरून व हिमालयातून आणलेले शेकडो हत्ती इकडून तिकडे फिरताना दिसत. ते सर्व हत्ती उंच व शृंगारलेले असत. तसेच सिंध, कांबोज, बटक इत्यादी देशातून आणलेले हजारो सुंदर घोडेही नगरीत पाहावयास मिळत. त्या घोड्यांवरून व हत्तींवरून जाणारे वीरही इतर ठिकाणी दिसण्यासारखे नव्हते. शत्रू गैरसावध असता त्यावर ते कधीही बाण टाकत नसत व त्यांचा टाकलेला बाण कधीही व्यर्थ जात नसे. ते आपल्या नुसत्या बाहूंनी वाघासारखे बलाढ्य प्राणी मारू शकत.

अशा शूर क्षत्रियांनी त्याचप्रमाणे विद्वान ब्राह्मणांनी व श्रीमान व्यापाऱ्यांनी भरलेल्या या राजधानीत इक्ष्वाकू वंशातील राजा दशरथ राज्य करत होता. तो मोठा न्यायी व दूरदर्शी असून लोकास अत्यंत प्रिय होता. तो अत्यंत धर्मशील व पराक्रमी असून त्याने अनेक राज्ये जिंकली होती. तो सर्व पृथ्वीवर विख्यात असून शेकडो राजे त्याच्याशी सौख्य करण्याची इच्छा करत होते.

अशा या दशरथ राजास तीन राण्या होत्या. कौसल्या सर्वात श्रेष्ठ होती आणि स्वभावाने फार प्रेमळ होती. सुमित्रा हळव्या मनाची होती तर कैकयी राजाची फार लाडकी होती; पण स्वभावाने फार हट्टी होती.

दशरथाला सर्व सुखं होती; पण त्याला मूलबाळ नव्हते. त्यामुळं ते एकच दु:ख त्याच्या अंतरात सतत त्याला छळत राहायचं. साऱ्या प्रजेलाही वाटायचं की, आपल्या लाडक्या राजाच्या पदरात देवाने एखादे तरी मूल जन्मास द्यावे.

राजा दशरथ रात्रंदिवस याच चिंतेने ग्रासला होता आणि अशा समयासच दशरथाच्या आशेला उजाळा देणारी एक घटना घडली.

✦

## श्रावणाच्या मातापित्यांचा शाप

दशरथ राजा धनुर्विद्येत फार प्रवीण होता. धनुर्विद्येचे फार मोठे कौशल्य त्याच्या अंगी होते. अंधारात किंवा नुसते डोळे मिटून नुसत्या ध्वनीच्या आधारे तो अचूक शरसंधान करे. एकदा त्याला स्वप्न पडले. त्यात तो दोन पुरुष आणि एक स्त्री यांना ठार मारत आहे असे त्याला दिसले. ती माणसे निरपराध होती. स्वप्नातून दशरथ जागा झाला. त्याला वाटले हे स्वप्न फारच वाईट आहे.

असले हे स्वप्न आपणाला का पडले असावे याचा तो विचार करू लागला. आजपर्यंत आयुष्यभर आपण पुण्यकर्मेच करीत आलो. आपल्या हातून कधीच अन्याय घडलेला नाही मग हे असले भयंकर स्वप्न आपणाला का पडले असावे ?

दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळीच तो राजगुरू वसिष्ठांना भेटला. वसिष्ठांना त्यानं आपलं स्वप्न सांगितलं आणि त्याचा अर्थ विचारला.

वसिष्ठांनी थोडा वेळ विचार केला आणि ते दशरथाला म्हणाले, ''तू शिकारीला जा आणि तीन पशूंची हत्या कर म्हणजे दुष्ट स्वप्नाचा दोष नाहीसा होईल.''

वसिष्ठ ऋषींनी सांगितल्याप्रमाणे राजा दशरथ त्याच दिवशी शिकारीला बाहेर पडला. दिवसभर तो घनदाट अरण्यात फिरत राहिला; पण शिकार काही सापडली नाही. होता होता संध्याकाळ होत आली. मग त्यानं विचार केला – आपण एखाद्या सरोवराच्या काठी जाऊन लपून बसावं. यावेळी श्वापदे पाणी प्यायला येतात. हा विचार करून तो लगेच एका सरोवराच्या काठी आला आणि सरोवरापासून थोड्या दूर अंतरावर जाऊन दाट झाडीत लपून बसला.

हळूहळू रात्र वाढत गेली. दशरथ सावध होता. त्याचे कान पाण्याच्या आवाजाच्या दिशेने लागले होते. अगदी बारीकशीही हालचाल टिपण्यास तो सज्ज होता.

आणि अचानक पाण्याचा बुडबुड असा आवाज त्याच्या कानांवर आला. दशरथाने झटकन त्या आवाजाच्या दिशेने आपला तीक्ष्ण बाण सोडला.

बाण लक्ष्यावर अचूक लागला.


पण प्राण्याची आरोळी ऐकू न येता मानवाची किंकाळी त्याच्या कानांवर आली.

दशरथाला एकदम धक्का बसला.

त्याच्या काळजात धस्स झाले आणि त्याच्या ओठातून एकदम शब्द बाहेर पडले, ‘‘अरेरे... माझ्या हातून कुठल्यातरी निरपराध माणसाची हत्या झाली वाटतं.’’

असं म्हणून तो धावतच सरोवराजवळ पोहोचला आणि क्षणभर त्याची पावलं तशीच जाग्यावर रुतून राहिली.

त्यानं समोर पाहिलं.



सरोवराच्या काठी एक तरुण तपस्वी जमिनीवर वेदनेने लोळण घेत होता आणि त्याच्या छातीत दशरथाने मारलेला बाण अगदी घट्ट रुतून बसला होता. त्याच्याजवळ पाण्याचा घडा पडलेला दिसत होता.

दु:खाने उद्विग्न होऊन दशरथ जड पावलानं त्याच्याजवळ गेला आणि त्याच्याजवळ बसत त्यानं विचारलं, ''बाळ, तू कोण आहेस ? आणि एवढ्या रात्री तू इथं पाणी न्यायला का आला होतास ? मी अयोध्या नगरीचा राजा दशरथ इथं शिकारीसाठी आलो होतो. पाण्याचा आवाज ऐकून मी बाण सोडला आणि माझ्या हातून हे महापाप घडलं. ही चूक मी जाणूनबुजून केलेली नाही. तरीपण हे महात्मन, मला क्षमा कर.''

बाणाने घायाळ झालेल्या त्या तरुण तपस्व्याने दशरथाकडे पाहिलं आणि आपल्या क्षीण आवाजात तो म्हणाला,

''हे राजन, माझं नाव श्रावणबाळ आहे. माझ्या वृद्ध आई–बापांना कावडीत बसवून मी यात्रेला चाललो होतो. ती दोघंही आंधळी आहेत. त्यांना खूप तहान लागली होती. म्हणून इथंच थोड्या अंतरावर त्यांना बसवून मी पाणी आणण्यासाठी या सरोवराजवळ आलो होतो पण... राजन माझी एक विनंती ऐका... तुम्ही त्यांना पाणी नेऊन द्या; पण तुमच्या मुलाला बाण लागला आहे हे मात्र त्यांना सांगू नका. माझं एवढं ऐका... राजन माझी शेवटची ही विनंती... ऐका....''

आणि एवढं बोलून श्रावणानं आपला प्राण सोडला. राजा दशरथ पश्चात्तापाने विव्हल होत काही वेळ तसाच बसून स्वत:ला दूषणे देत राहिला, 'अरेरे... माझ्या हातून काय घडलं हे आज ? मी एका निरपराध्याची हत्या केली. आज मी केवढं मोठं पाप केलं.' आणि मग एकदम त्याला श्रावणाच्या आई–वडिलांची आठवण झाली.

तो जड मनानं आणि जड पावलानं उठला. त्यानं तो घडा उचलला. पाण्यानं भरला आणि पाण्याचा घडा हातात घेऊन तो जडपणे श्रावणाच्या आईबापांना इकडं–तिकडं शोधत फिरू लागला.

आणि अचानक त्याची नजर एका झाडाखाली बसलेल्या श्रावणाच्या आईबापाकडं गेली. तसा तो हातातला घडा घेऊन अगदी जड पावलानं त्यांच्याजवळ जाऊन उभा राहिला.

त्याच्या पावलाच्या चाहुलीनं श्रावणाचा वृद्ध पिता त्याला म्हणाला, ''श्रावणा, सापडलं का रे पाणी ? जरा लवकर दे. फार तहान लागली आहे रे.''

दशरथ राजाने आपल्या थरथरत्या हाताने तो घडा त्या वृद्धाच्या हातात दिला. घडा हातात घेऊन तो वृद्ध तो तोंडाला लावणार एवढ्यात तो वृद्ध म्हणाला,

''श्रावणा, तू बोलत का नाहीस ?''

राजा दशरथाची मान आपोआप खाली झुकली.

''श्रावणा, अरे तू का बोलत नाहीस ?'' तो वृद्ध पुन्हा म्हणाला.

''श्रावणा, तुला फार त्रास होतो का ? पाण्यासाठी फार दूर जावं लागलं का ? अवेळी तुला पाणी आणायला सांगितलं. त्यामुळं तुला राग आला का ?'' त्या वृद्ध स्त्रीनं म्हटलं.

''श्रावणा, तू बोलल्याशिवाय मी पाणी पिणार नाही.'' तो वृद्ध व्याकूळ स्वरात म्हणाला.